# कोविड १९ भरतीप्रक्रिया
# जिल्हा एकात्मिक आरोग्य सोसायटी, रायगड
## दुरध्वनी क्रमांक ०२१४१ -२२२१५७

रायगड जिल्हातील कोरोना विषाणु (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी व करारपध्दतीने मानधन तत्वावर खालील पदासाठी दि.३०/०४/२०२१ रोजी पर्यंत अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | मानधन | भरावयाची पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | Physician | MD Medicine with Council Registration | 75000+performance | 06 |
| 2 | Anesthetist | Degree/Diploma in Anesthesia with valid Council Registration | 75000+performance | 05 |
| 3 | Medical Officer | MBBS/BDS with valid Council Registration | MBBS- 60000<br>BDS- 28000 | 74 |
| 4 | Ayush Mo | BAMS/BUMS with Valid Council Registration | 28000 | 79 |
| 5 | X-Ray Technician | 10+2 with Diploma in x-Ray Technician from Govt. Recognized Institute | 17000 | 08 |
| 6 | ECG Techician | B.sc with Physics/Chemistry/Biology and Experience of ECG Tech. at least one yr. | 17000 | 11 |
| 7 | Hospital Manager | Any medical graduate with one year experience of Hospital administration with Valid Council Registration | 35000 | 35 |
| 8 | Staff Nurse | GNM /Bsc Nursing with Valid Council Registration from Govt. Recognized Institute<br>ANM with Valid Council Registration from Govt. Recognized Institute | GNM /Bsc Nursing - 20000<br>ANM-18000 | 151 |
| 9 | Lab Technician | B Sc DMLT from Govt. Recognized Institute | 17000 | 34 |
| 10 | Pharmacist | D. Pharm /B. Pharm Registration from Govt. Recognized Institute with valid Council Registration. | 17000 | 27 |

**सर्वसाधारण अटी व शर्ती-**

१) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकिय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

२) सर्व उमेदवारांनी ए – ४ साईज कागदावर विहीत नमुन्यात सदर अर्ज टंकलिखीत अथवा संगणकीकृत करणे बंधनकारक राहील. अर्जाचा नमुना हा जाहीरातीसोबत प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

३) अर्जासोबत -

- वयाचा पुरावा
- शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र
- आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका

- संबंधित पदांकरिता तत्सम कौन्सीलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र (पर्मनंट) व नुतनीकरण जोडणे बंधनकारक राहील.
- शासकिय/निमशासकीय संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र

या प्रमाणे कागदपत्रे जोडण्यात यावीत.

४) उमेदवारांची निवड झाल्यास त्यास कोविड १९ साठी नेमणुक देण्यात येणार असुन त्यांची नेमणुक ही तीन महिने किंवा कोविड १९ साथ असेपर्यत जे आधी घडेल ते, या कालावधी करिताच नियुक्ती देण्यात येईल. सदर नियुक्ती कोविड १९ साथ कालावधीपुरतीच (तीन महिने किंवा त्यापेक्षा कमी) राहणार असुन सदर साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील कोविड १९ उपचार कक्ष बंद झाल्यास किंवा लसीकरण बंद झाल्यास सदरील नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५) पदासमोर नमूद मानधन हे एकत्रीत मानधन असून त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

६) राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कर्मचा-यांसाठी असणारे करारपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

७) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौज़दारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

८) सदर रिक्त पदांची संख्या आवश्यकतेनुसार व राष्ट्रीय आरोग्य सोसायटीच्या सुचनांनुसार कमी-जास्त होऊ शकते याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९) पुनर्नियुक्तीबाबत, शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

१०) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

११) कोणत्याही उमेदवारांनी या कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवुन कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

१२) उमेदवारास सेवाप्रवेशाची किमान वयोमर्यादा किमान वय १८ वर्ष व कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करिता ४३ वर्षे राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवाराकरिता कमाल प्रवेश ५ वर्षापर्यत शिथिल राहिल. वैदयकिय अधिकारी, विशेषतज्ञ व अति विशेषतज्ञ यांचे करिता सेवा प्रवेशाची वयोमर्यादा ७० वर्षापर्यत राहिल.नर्सिंग व पॅरामेडिकल स्टाफ याचेकरिता सेवाप्रवेशाची वयोमर्यादा ६५ वर्षापर्यत राहिल.

१३) भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुसूचीत मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल.

१४) सदर अर्जांची छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी करुन आवश्यकतेनुसार नियुक्ती आदेश देणेत येतील. इच्छुक उमेदवारांनी दि.३०/०४/२०२१ रोजी पर्यंत ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव स्पष्टपणे लिहून विहीत नमुन्यामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, दुसरा मजला, ओपीडी बिल्डिंग, जिल्हा रुग्णालय, अलिबाग येथे अर्ज सादर करावा.

**१५) वरील पदांकरीता उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रथम येणाऱ्या उमेदवारास प्राधान्य राहिल व त्यास आवश्यकतेनुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील. (कोविड १९ उपचार कक्ष सुरु असेपर्यंत/लसीकरण सुरु असेपर्यत)**

१६) कामावर रुजु होताना आपण सादर केलेली माहितीची आपल्या मुळ कागदपत्रांशी तपासणी होणार असल्याने, त्यात काही अनियमितता आढळल्यास आपले नियुक्ती आदेश रद्द करण्यात येईल याची उमेदवारानी नोंद घ्यावी.

१७) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजु होताना सादर करावा लागेल.

१८) जसजसे कोविड -१९ साठी तयार केलेली रुग्णालये कार्यान्वित करण्यात येतील किंवा मनुष्यबळाच्या आवश्यकतेनुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील.

१९) उमेदवारास कोणत्याही प्रकारचे दुर्धर आजार,Hypertension,डायबेटीस असल्यास अर्ज करु नये.

२०) भरती प्रक्रियेत संपुर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रदद करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा.जिल्हाधिकारी, रायगड - अलिबाग यांनी राखुन ठेवलेले आहेत.

26/4/2021

**(डॉ. सुहास माने)**
**जिल्हा शल्यचिकीत्सक,**
**रायगड -अलिबाग**